# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** शिक्षण विभागाकडून "ई-प्रशासन" या प्रणालीद्वारे म.न.पा.च्या सर्व
**{माहिती व तंत्रज्ञान विभाग }** शाळांमधील शिक्षण विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा, संपूर्ण शाळेंचे दस्ताऐवज व तपशिल केंदिकृत करणे प्रस्तावित आहे. त्यानूसार प्रायोगिक तत्वावर आर.बी.जी.जी माध्यमिक शाळेतील सन 2014 ते 2022 पर्यंतचा विद्यार्थ्यांचा शालेय रेकॉर्ड डिजिटल स्वरुपात साठविण्यात आलेला आहे. तसेच या डिजिटल माहितीच्या आधारे 80 विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या प्रणालीच्या वापरामुळे विद्यार्थ्यांचा रेकॉर्ड संगणकावर तपासता येवुन त्यांना संगणकावर तयार करण्यात आलेले शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र तत्परतेने देता आले. तसेच विद्यार्थ्यांचे ओळखपत्र शाळेतच तयार करण्याबाबत कार्यवाही करता येते. सोबतच विद्यार्थ्यांच्या वर्गावर उपस्थितीची माहिती संगणकावर साठविता येते. विद्यार्थ्यांच्या जन्मतारखेनुसार दर महिन्यातील वाढदिवसाची माहिती काढता येते. विद्यार्थ्यांच्या धर्मानुसार माहिती घेता येते. विद्यार्थ्यांची लिंग निहाय, मागास प्रवर्ग निहाय माहिती ठेवता येते. शाळेची शिक्षंकाची हजेरीची माहिती सुध्दा या प्रणालीत नमुद करुन मुख्याध्यापक यांच्या करीता डिजिटल डॅशबोर्ड तयार करता येते. यामुळे सदर उपक्रम शालेय कार्य तत्परतेने करण्यासाठी खूपच उपयुक्त आहे.

मनपा शाळेतील जुना रेकॉर्ड हा जिर्ण होत असुन तो हाताळतांना त्यांचे तुकडे होतात. यामुळे नागरिकांना जात पडताळणी करिता व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र देता येत नाही. याकरीता सर्व जुना रेकॉर्ड स्कॅन करुन तसे डिजिटल स्वरुपात जतन केल्यास यापुर्वी शिक्षण सोडलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांची माहिती संगणकावर सर्च करुन त्यांना शाळा सोडल्याचे दुय्यम प्रमाणपत्र अवश्यकतेनुसार नागरिकांना तत्परतेने देता येईल. त्यानुसार ई-प्रशासन ही प्रणाली मनपाच्या सर्व शाळांमध्ये स्थापित करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो खालील प्रमाणे आहे.

| Estimated cost for Nagpur Municipal Corporation | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Services** | **Rate** | **School/Students** | **Amount** |
| 1 | "e-प्रशासन" School Management ERP software (For Running Schools) | रु. 19,812.66/- | Approx 476 Schools | रु. 25,48,305/- |
| 2 | Support and Implementation (1 Year Software Service Support & Implementation) | For Provision of 2 Resource (1-NMC Office) (1-Company Office) | - | रु. 10,16,949/- |
| 3 | Old Record Digitalization | रु. 14.00 per entry/- | 6,25,000 | रु. 87,50,000/- |
| | | GROSS TOTAL | | रु. 1,23,15,254/- |
| | | GST (18%) | | रु. 22,16,745/- |
| | | NET TOTAL | | रु. 1,45,31,999/- |
| In Words - One Crore Forty Five Lakh Thirty One Thousand Nine Hundred Ninety Nine Rupees Only | | | | |

वरील प्रमाणे ई-प्रशासन प्रणाली मनपाच्या सर्व शाळांमध्ये स्थापित करण्यासाठी अंदाजे रुपये 1,45,31,999) -/GST सह) इतका खर्च अपेक्षित असून उक्त कामास व आवश्यक खर्चास मान्यता देणे तसेच उक्त कामाची निविदा प्रकाशित करण्याबाबतच्या प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :- 1) उक्त खर्च पद क्र. A-मधून करण्याचे प्रस्तावित आहे 48200174201.

2) सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 351/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 04/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शिक्षण विभागाकडून “ई-प्रशासन” या प्रणालीद्वारे म.न.पा.च्या सर्व शाळांमधील शिक्षण विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा, संपूर्ण शाळेंचे दस्ताऐवज व तपशिल केंदिकृत करणे प्रस्तावित आहे. त्यानूसार प्रायोगिक तत्वावर आर.बी.जी.जी माध्यमिक शाळेतील सन 2014 ते 2022 पर्यंतचा विद्यार्थ्यांचा शालेय रेकॉर्ड डिजिटल स्वरुपात साठविण्यात आलेला आहे. तसेच या डिजिटल माहितीच्या आधारे 80 विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या प्रणालीच्या वापरामुळे विद्यार्थ्यांचा रेकॉर्ड संगणकावर तपासता येवुन त्यांना संगणकावर तयार करण्यात आलेले शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र तत्परतेने देता आले. तसेच विद्यार्थ्यांचे ओळखपत्र शाळेतच तयार करण्याबाबत कार्यवाही करता येते. सोबतच विद्यार्थ्यांच्या वर्गावर उपस्थितीची माहिती संगणकावर साठविता येते. विद्यार्थ्यांच्या जन्मतारखेनुसार दर महिन्यातील वाढदिवसाची माहिती काढता येते. विद्यार्थ्यांच्या धर्मानुसार माहिती घेता येते. विद्यार्थ्यांची लिंग निहाय, मागास प्रवर्ग निहाय माहिती ठेवता येते. शाळेची शिक्षंकाची हजेरीची माहिती सुध्दा या प्रणालीत नमुद करुन मुख्याध्यापक यांच्या करीता डिजिटल डॅशबोर्ड तयार करता येते. यामुळे सदर उपक्रम शालेय कार्य तत्परतेने करण्यासाठी खूपच उपयुक्त आहे.

मनपा शाळेतील जुना रेकॉर्ड हा जिर्ण होत असुन तो हाताळतांना त्यांचे तुकडे होतात. यामुळे नागरिकांना जात पडताळणी करिता व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र देता येत नाही. याकरीता सर्व जुना रेकॉर्ड स्कॅन करुन तसे डिजिटल स्वरुपात जतन केल्यास यापुर्वी शिक्षण सोडलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांची माहिती संगणकावर सर्च करुन त्यांना शाळा सोडल्याचे दुय्यम प्रमाणपत्र अवश्यकतेनुसार नागरिकांना तत्परतेने देता येईल. त्यानुसार ई-प्रशासन ही प्रणाली मनपाच्या सर्व शाळांमध्ये स्थापित करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो खालील प्रमाणे आहे.

| **Estimated cost for Nagpur Municipal Corporation** | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Services** | **Rate** | **School/Students** | **Amount** |
| 1 | “e-प्रशासन” School Management ERP software (For Running Schools) | रु. 19,812.66/- | Approx 476 Schools | रु. 25,48,305/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | Support and Implementation (1 Year Software Service Support & Implementation) | For Provision of 2 Resource (1-NMC Office) (1-Company Office) | - | रु. 10,16,949/- |
| 3 | Old Record Digitalization | रु. 14.00 per entry/- | 6,25,000 | रु. 87,50,000/- |
| | | GROSS TOTAL | | रु. 1,23,15,254/- |
| | | GST (18%) | | रु. 22,16,745/- |
| | | NET TOTAL | | रु. 1,45,31,999/- |
| In Words - One Crore Forty Five Lakh Thirty One Thousand Nine Hundred Ninety Nine Rupees Only | | | | |

वरील प्रमाणे ई-प्रशासन प्रणाली मनपाच्या सर्व शाळांमध्ये स्थापित करण्यासाठी अंदाजे रुपये 1,45,31,999) -/GST सह) इतका खर्च अपेक्षित असून उक्त कामास व आवश्यक खर्चास मान्यता देणे तसेच उक्त कामाची निविदा प्रकाशित करण्याबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.